## जनसंपर्क विभाग

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/16/बातमी/ईमेल/2020 दिनांक:- 13 मार्च, 2020

जळगाव दि.१३ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन २०२०-२१ च्या ३०४.५२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या अधिसभेत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात ३४.९५ कोटी रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

शुक्रवार, दि.१३ मार्च रोजी अधिसभेची बैठक झाली. सदस्य दीपक बंडू पाटील यांनी अधिसभेत हा अर्थसंकल्प सादर केला. विकासाला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प असून यामध्ये परिरक्षणासाठी १८९.८० कोटी रुपये, योजनांतर्गत विकासासाठी रुपये ५७.४६ कोटी आणि विशेष कार्यक्रम/योजनांसाठी ५७.२६ कोटी अशी खर्चासाठी एकूण ३०४.५२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात उत्पन्नाची बाजू २६९.५७ कोटी इतकी असल्यामुळे रुपये ३४.९५ कोटी इतक्या तुटीचा हा अर्थसंकल्प आहे. खर्चात बचत करुन ही तुट भरुन काढण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विकासाला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

विद्यापीठात शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण व आदिवासी भागातील असून त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा देण्याचा संकल्प या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात काही योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. विद्यापीठ प्रशाळा व उपकेंद्रासाठी १३.१९ कोटींची तरतुद करण्यात आली असून विविध प्रशाळांतर्गत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना संशोधन करतांना अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून टिचींग असोसिएटशीप प्रोग्राम अंतर्गत २५ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी कल्याण, क्रीडा, वसतिगृह आदी विभागांतर्गत विविध योजनांसाठी ८.३७ कोटींची तरतुद केली आहे. विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ विविध ३७ योजना राबवित आहे. मागील वर्षाच्या या सर्व योजना कायम ठेवण्यात आल्या आहेत. क्रीडा अंतर्गत असलेल्या १३ योजनांसाठी १० लाख रुपयांची वाढीव तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृहासाठी ३५ लाख, ज्ञानस्त्रोत केंद्रासाठी २६ लाख तरतुद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्यावतीने सेंटर फॉर एक्सलन्स व सिलेज उपक्रमांतर्गत प्रस्तावित नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी १ कोटी ५ लाख रुपयांची तरतुद केली गेली असून आंतर शाखीव विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांकडून आदिवासी भागातील उपक्रमांसाठी विविध संशोधन प्रकल्प राबविले जाणार आहेत. नंदुरबार येथे सिलेज आधारित क्षेत्र विकास प्रकल्पांतर्गत ११३ पाडयांची निवड करण्यात आली असून विविध सहभागी संस्थासोबत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार मिळावा या दृष्टीने पारंपरिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणे आणि एम.एस्सी.च्या नविन अभ्यासक्रमानुसार (सीबीसीएस) नवीन उपकरणे खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या जन्मदिनी गत वर्षाप्रमाणे दोन दिवसीय विद्यार्थी साहित्य संमेलन घेतले जाणार असून

त्यासाठी ५ लाखाची तरतूर करण्यात आली आहे. विद्यापीठ क्रीडा मंडळातर्फे विद्यापीठस्तरीय क्रीडा महोत्सव घेतला जाणार असून त्यासाठी १२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयामार्फत आलेल्या अध्यादेशाव्दारे दिव्यांगासाठी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांसाठी वार्षिक अंदाजपत्रकाच्या एक टक्का तरतूदींतर्गत विविध अर्थशिर्षांतर्गत विद्यापीठात रॅम्पस आणि लिफट बसविणेचे प्रस्तावित आहे. दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव सलग दुसऱ्या वर्षी घेतला जाईल.

विद्यापीठ परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने त्याकरीता एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ कायद्यातील कलम ५(८) च्या अनुषंगाने नंदुरबार जिल्हयातील मोलगी येथे विद्यापीठ संचलित महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. क्षमता विकास केंद्रांतर्गत शिक्षकांकरीता त्रैमासिक क्षमता विकास विकास कार्यशाळा वर्षभरात एकूण ०४ कार्यशाळा प्रस्तावित आहेत. पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय ८ कार्यशाळा प्रस्तावित आहेत. अत्याधुनिक विश्लेषणात्मक साहित्य इमारतीसाठी २ कोटींची तरतुद करण्यात आली आहे. बहिणाबाई अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी रु.१.५ कोटी, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संशोधनासाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून रु. १.५ कोटी अशी तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

दीपक पाटील यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पानंतर त्यावर अनेक सदस्यांनी आपले मत व्यक्त केले. या अर्थसंकल्पाचे सर्व सदस्यांनी स्वागत केले. विविध प्रकारच्या नवीन योजना या अर्थसंकल्पात मांडण्यात आल्या असून त्याद्वारे विद्यापीठ विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन सदस्यांनी काही सूचना देखील केल्या. या चर्चेत प्राचार्य आर.एस.पाटील, प्रा.संजय सोनवणे, अमोल मराठे, दिलीप पाटील, दिनेश नाईक, एकनाथ नेहेते, के.जे.कोल्हे,आदींनी भाग घेतला. नितीन ठाकूर व प्रा.गौतम कुवर यांनी कपात सूचना मांडल्या होत्या. चर्चेनंतर त्या मागे घेण्यात आल्या. त्यानंतर अर्थसंकल्पाला सभागृहाने मान्यता दिली.

बैठकीत प्रारंभी माजी सिनेट सदस्य धनंजय रौंदळे, के.बी.दिवटे तसेच उदय वाघ, माजी सिनेट सदस्य प्रभाकर चव्हाण यांच्या मातोश्री जावत्राबाई चव्हाण, सिनेट सदस्य सतिष पाटील यांच्या मातोश्री मनकर्णिका पाटील हे दिवंगत झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली वाहणारा शोकप्रस्ताव मांडण्यात आला. प्रा.संजय सोनवणे, नितीन ठाकूर, अमोल सोनवणे, दिलीप पाटील यांनी हे ठराव मांडले. सभागृहाने या दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण केली. सभागृहात काही अभिनंदनाचे ठराव संमत झाले. यामध्ये विष्णू भंगाळे यांनी महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्याबददल मांडलेल्या अभिनंदन ठरावाला ॲड.संदीप पाटील, दिलीप पाटील, प्रा.संजय सोनवणे, प्राचार्य आर.एस.पाटील, जी.वाय.पाटील यांनी अनुमोदन दिले. विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे सरसकट परीक्षा शुल्क माफ केल्याबददल अमोल मराठे तर महाविद्यालयांनी प्लेसमेंट सेल व्दारे विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन दिल्याबददल महाविद्यालयाचे अभिनंदन करणारा ठराव प्रा.गौतम कुवर यांनी मांडला. प्रा.मधु खराटे यांनी हिंदी विषयाचे सुवर्णपदक स्थापित केल्याबददल प्रा.खराटे यांची अभिनंदन करणारा ठराव देखील झाला. याशिवाय युवारंग युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केल्याबददल दिनेश खरात यांनी व वर्षभरात विविध क्रीडा प्रकारात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश

## जनसंपर्क विभाग

संपादन केल्याबददल विद्यापीठ क्रीडा संचालकांचे अभिनंदन करणारा ठराव सुरेश पवार यांनी मांडला. प्रभारी अधिष्ठाता झाल्याबददल प्रा.अशोक राणे, नुतन सिनेट प्राचार्य राजू फालक यांचे अभिनंदन करणारा ठराव प्रा.अनिल पाटील यांनी मांडला. दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवाच्या आयोजनाबददल तसेच रा.से.यो.चा उत्कर्ष महोत्सव आयोजित केल्याबददल राजेंद्र नन्नवरे,दिनेश नाईक यांनी अभिनंदनाचे ठराव मांडले. नॅकचे मुल्यांकन केलेल्या महाविद्यालयांचे, नवउद्योजकांसाठी त्रिवेणी शिखर परिषद यशस्वी आयोजित केल्याबददल तसेच सर्व परीक्षांचे निकाल मुदतीच्या आत लावल्याबददल अभिनंदन करणारे ठराव मनीषा चौधरी, नितीन बारी व नितीन ठाकूर यांनी मांडले. या विविध ठरावांना जी.वाय.पाटील, प्रा.पी.बी.अहिरराव, मनीषा चौधरी, विष्णू भंगाळे, प्रा.सुनील गोसावी, प्रा.के.जी. कोल्हे, प्रा.एकनाथ नेहेते, अमोल सोनवणे, नितीन ठाकूर, प्रा.संजय सोनवणे, राजेंद्र जाखडी, नितीन झाल्टे यांनी अनुमोदन दिले.

सभागृहात विद्यापीठाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सतीष पाटील, दिलीप पाटील, विष्णू भंगाळे, नितीन ठाकूर, गौतम कुवर, अमोल सोनवणे, आदींनी भाग घेतला. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी उत्तरे दिली.

प्रश्नोत्तराच्या तासात दिनेश खरात, प्रा.पी.बी.अहिरराव, मनीषा चौधरी यांच्या प्रश्नांना डॉ.रत्नमाला बेंद्रे, प्रा.मोहन पावरा यांनी उत्तरे दिली.

बैठकीचे सुत्रसंचालन प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी केले.

---

### बातमी क्र.२

जळगाव दि.१३ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून राजू फालक यांची आज अधिसभेच्या बैठकीत बिनविरोध निवड झाली.

विद्यापीठ कायदयानुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर इतर मागास प्रवर्गातून एक सदस्य निवडून द्यावयाचा होता. त्यासाठी विद्यापीठाने निवडणूक कार्यक्रम जाहिर केला होता. भुसावळ येथील दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयाचे प्राचार्य राजू फालक यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला होता. आज १३ मार्च रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत प्राचार्य फालक यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी जाहिर केले. प्राचार्य फालक यांना निवडून आल्याचे प्रमाणपत्र कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्राचार्य आर.एस.पाटील, प्राचार्य एल.पी.देशमुख, दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी, डॉ.रत्नमाला बेंद्रे आदींनी प्राचार्य फालक यांचे अभिनंदन केले.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०२० दिनांक : १३ मार्च, २०२०

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी